नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे


YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २३३ Issue - 233 | वार गुरूवार दि. ९ जानेवारी २०२५ Blow- Thursday Date 9 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### प्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि लेखक प्रीतीश नंदी यांचं निधन

मुंबई : पत्रकारिता करुन चित्रपट निर्माते, लेखक तसंच दिग्दर्शक झालेल्या प्रीतीश नंदी यांचं निधन झालं आहे.



वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सिनेनिर्माते कुशन नंदी यांचे ते सुपुत्र होते. अभिनेते अनुपम खेर यांनी प्रीतीश नंदी यांच्या निधनाबाबत पोस्ट करत माहिती दिली आहे. प्रीतीश नंदी हे उत्तम कवीही होते. अनुपम खेर यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. माझा खूप जवळचा मित्र असलेला प्रीतीश नंदी याच्या निधनाचं वृत्त ऐकून मला धक्का बसला आहे. तसंच अतीव दुःख झालं आहे. एक अद्भुत कवी, लेखक तसंच साहसी संपादक आणि पत्रकार मित्र आपण गमावला आहे. मुंबईत मी जेव्हा आलो तेव्हा प्रीतीश माझी सपोर्ट सिस्टिम आणि ताकद यांचा मोठा स्रोत होता. या आशयाची पोस्ट अनुपम खेर यांनी केली आहे. प्रीतीश नंदी हे एक उत्तम कवी, लेखक, पत्रकार आणि संपादक होते, तसंच त्यांनी चित्रपटांची निर्मितीही केली होती. १५ जानेवारी १९५१ या दिवशी प्रीतीश नंदी यांचा जन्म झाला होता. द इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया चे ते संपादक होते. साहित्य आणि पत्रकारिता त्यांच्या आवडीचे विषय होते. चित्रपटाच्या निर्मिती क्षेत्रातही त्यांनी चांगलं यश मिळवलं. त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवण्या आलं होतं. प्रीतीश नंदी यांनी चमेली, झंकार बीट्स, हजारो ख्वाहिशे ऐसी, अग्ली और पगली, रात गई बात गई, शादी के साईड इफेक्ट्स या चित्रपटांची निर्मिती केली होती. प्रितिश नंदी हे पत्रकार आणि समाजसेवकही होते. नंदी यांनी १९९० च्या दशकात दूरदर्शनवरील 'प्रितिश नंदी शो' नावाचा टॉक शो देखील होस्ट केला होता. त्यात ते सेलिब्रिटींच्या मुलाखती घेत असत. कवी ,चित्रकार, पत्रकार, संसदपटू, मीडिया आणि दूरदर्शन आदीत त्यांनी मोठे काम केले होते. ते महाराष्ट्रातून राज्यसभेचे खासदार होते. शिवसेनेच्या कोट्यातून राज्यसभेवर ते निवडून गेले होते. त्यांच्या कवितांची इंग्रजी भाषेतील चाळीसहून अधिक पुस्तके आहेत. त्यांनी बंगाली, उर्दू आणि पंजाबी भाषेतील इतर लेखकांच्या कविता तसेच उपनिषदच्या नवीन आवृत्तीचे भाषांतर केले आहे.

# तिरूपती बालाजी मंदिरात चेंगराचेंगरी, सहा भाविकांचा मृत्यू



## मृत भाविकांमध्ये एका महिलेचा मृत्यू; आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी व्यक्त केलं दुःख

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

हैदराबाद : तिरुपती बालाजीचं दर्शन घ्यावं, अशी देशभरातील लाखो भाविकांची इच्छा असते. दररोज हजारो भाविक तिरुपती मंदिरात जाऊन बालाजी दर्शन घेतातही. तिरुपतीचं बालाजी मंदिर हे जागृत देवस्थान आहे. पण याच मंदिरात आज अतिशय मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. आंध्र प्रदेशमधील प्रसिद्ध तिरुपती मंदिरात वैकुंठद्वार दर्शनासाठी असलेल्या पास केंद्रावर चेंगराचेंगरी झाल्याने सहा भाविकांचा मृत्यू झाला आहे. आज सकाळपासूनच हजारो भाविक वैकुंठ द्वार दर्शनाच्या टोकन मिळवण्यासाठी तिरुपतीच्या विविध पास केंद्रांवर रांगेत उभे आहेत. या दरम्यान भाविकांना बैरागी पट्टीडा पार्क येथे पास घेण्यासाठी रांगेत उभं राहण्यास सांगितलं गेलं तेव्हा ही चेंगरा चेंगरी झाली ज्यामध्ये सहा भाविकांचा मृत्यू झाला.

चेंगराचेंगरीनंतर परिसरात मोठा गोंधळ उडाला. त्यात सहा भाविकांचा मृत्यू झाला. यामध्ये मल्लिका नावाच्या एका महिलेचा समावेश आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तिरुपती पोलिसांनी प्रयत्न केले. त्यांनी थोड्याच वेळात परिस्थितीवर नियंत्रणही मिळवलं.

चेंगराचेंगरीत अनेक भाविक आजारी पडले, काहीजण बेशुद्धही पडल्याची माहिती आहे. जखमी झालेल्या भाविकांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिरुपती देवस्थान समितीने १०, ११ आणि १२ जानेवारी रोजी वैकुंठद्वार दर्शनाच्या पहिल्या तीन दिवसांसाठी १.२० लाख टोकन जारी करण्याचा निर्णय घेतला होता.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी चेंगराचेंगरीत भाविकांच्या मृत्यूबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री नायडू यांनी या घटनेतील जखमींवर करण्यात येत असलेल्या उपचारांबाबत अधिकाऱ्यांशी फोनवरून चर्चा केली. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनास्थळी जाऊन मदत कार्य करण्याचे आदेश दिले आहेत, जेणेकरून जखमींना चांगले उपचार मिळू शकतील.

आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांनीही सदर घटनेबाबत दुःख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबाबत माझ्या संवेदना आहेत. तसंच जे जखमी झाले आहेत त्यांना लवकर आराम मिळो अशी प्रार्थना मी करतो असंही जगन मोहन रेड्डी यांनी म्हटलं आहे.

## 'आपले सरकार' सेवा पोर्टलद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये वाढ करावी : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नागरिकांना आवश्यक त्या सेवा सुलभतेने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने 'आपले सरकार' सेवा पोर्टलद्वारे सद्यस्थितीत ५३६ ऑनलाईन सेवा दिल्या जात आहेत, त्याचा नागरिकांना व्यापक प्रमाणात उपयोग होत आहे. या पार्श्वभूमीवर या ऑनलाईन सेवांमध्ये वाढ करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांना आज दिले.



सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित राज्य सेवा हक्क आयोगाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी संबंधितांना निर्देशित केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले की, गतिमान पारदर्शक कार्यपद्धतीच्या दृष्टीने लोकांना उपयुक्त ठरत असलेल्या आपले सरकार सेवा पोर्टल द्वारे ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होते. या पार्श्वभूमीवर या पोर्टलवरील ऑनलाईन सेवांची संख्या वाढवण्याचे मुख्यमंत्र्यांनी सूचित केले. तसेच अधिक सक्रियतेने आणि सुलभरित्या व्यापक स्वरुपात या पोर्टलद्वारे नागरिकांना जास्तीत जास्त प्रमाणात ऑनलाईन सेवा उपलब्ध होतील यादृष्टीने नियोजन करण्याचे ही निर्देश यावेळी संबंधितांना दिले.

राज्य सेवा हक्क मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांनी यावेळी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या कार्यपद्धती बाबत तसेच भविष्यकालीन योजनांबाबत सविस्तर माहिती दिली.

बैठकीस, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार , वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, सामान्य प्रशासन विभागाच्या प्रधान सचिव व्ही.राधा, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यांच्यासह संबंधित विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी , राज्यातील सर्व राज्य सेवा हक्क आयुक्त आणि संबंधित उपस्थित होते.

## 'एक देश एक निवडणूक' मुद्द्यावर संसदीय समितीची वादळी बैठक

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशात एकाचवेळी लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुका घेण्यामुळे खरोखर किती पैशांची बचत होणार आहे? एकत्र निवडणुका घेण्याचा नेमका खर्च किती याचा अभ्यास केला गेला आहे? शिवाय, या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी किती मतदानयंत्रांची गरज भासेल आणि त्याची उपलब्धता आहे का, अशा तीक्ष्ण प्रश्नांची सरबत्ती विरोधकांनी प्रामुख्याने काँग्रेसच्या खासदारांनी बुधवारी 'एक देश एक निवडणूक' विधेयकासंदर्भातील संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीत केली.

देशात एकत्रित निवडणुका घेण्यासंदर्भातील दोन विधेयके संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत मांडली गेली होती. या विधेयकांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी संयुक्त संसदीय समिती नेमण्यात आली असून तिची पहिली बैठक बुधवारी झाली. या बैठकीमध्ये केंद्रीय विधि मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी सादरीकरण केले. या सादरीकरणामध्ये २००४ पूर्वी देशात झालेल्या निवडणुकांच्या खर्चासंदर्भातील संसदीय समितीच्या अहवालाचा उल्लेख केला गेला. मात्र २००४ पूर्वी मतदानयंत्रांचा वापर केला जात नव्हता. विधि मंत्रालयाच्या सादरीकरणाचा संदर्भात काँग्रेसच्या लोकसभेतील खासदार व समितीच्या सदस्य प्रियंका गांधी-वाड्रा यांनी गंभीर आक्षेप घेतले. विधि मंत्रालयाने दिलेली माहिती २००४ पूर्वीची असून त्यावेळी मतदानयंत्रांचा वापर होत नव्हता. मतदानयंत्रांचा वापर सुरू झाल्यानंतर निवडणूक खर्चही कमी झाला असे म्हणत प्रियंका यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले.

सत्ताधारी भाजप व एनडीएतील घटक पक्षांनी विधेयकाचे समर्थन केले. एकत्रित निवडणुका घेण्याला लोकांचा पाठिंबा असल्याचा दावा भाजपचे व्ही. डी. शर्मा यांनी केला. सातत्याने निवडणुका होत राहिल्या तर विकास कामांवर परिणाम होतो. त्यापेक्षा लोकसभा, विधानसभा तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र घेणेच योग्य आहे, असा मुद्दा शिवसेनेच्या शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी मांडला.

## अजित पवारांची दिल्लीत अमित शहांशी चर्चा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी महायुती सरकारवर दबाव वाढू लागला असतानाच बुधवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी सव्वातास चर्चा केली. मुंडे यांच्या बचावासाठी अजित पवारांनी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला साकडे घातल्याचे मानले जात आहे. देशमुख हत्याप्रकरणात धनंजय मुंडे यांचा निष्ठावान वाल्मीक कराडला अटक झाल्यानंतर विरोधकांनी मुंडेंच्या राजीनाम्यासाठी राज्यपालांची भेट घेतली. मात्र मुंडे यांच्या विरोधात पुरावे असल्याशिवाय राजीनामा घेणार नसल्याची स्पष्ट भूमिका अजित पवार यांनी घेतली होती. मुंडेंच्या राजीनाम्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अप्रत्यक्ष अजित पवार यांच्याकडे सोपवल्याचे स्पष्ट झाले आहे. असे असले तरी भाजपचे आमदार सुरेश धस यांनी फडणवीस यांची भेट घेऊन मुंडेंवरील दबाव कायम ठेवला आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी शहांची भेट घेतल्याने मुंडेंचे भवितव्य दिल्लीत ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अजित पवार हे प्रफुल पटेल व पार्थ पवार यांच्यासह दिल्लीत दाखल झाले.

### १२ पथके केली होती तैनात, सापळा रचून केली कारवाई

### पोलीस अधीक्षकांनी दिली पत्रकार परिषदेत दिली माहिती

# शहापूर ज्वेलर्सवरील हत्याकांडातील दोन आरोपींना अटक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : ठाणे जिल्ह्यातील शहापुरात पंडीत नाका येथील महालक्ष्मी ज्वेलर्स दुकानातील कामगाराव २१ डिसेंबर २०२४ रोजी रात्री ९.०० वा. च्या सुमारास जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने दोन अज्ञात आरोपींने मोटारसायकल वरून येवुन फायरिंग करून सोनाराची बॅग घेऊन पोबारा केला होता. शहापुर पोलीस ठाण्यात जबरी चोरीसह खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, मा. अपर पोलीस अधिक्षक भरत तांगडे, यांनी घटनास्थळावर भेट देवुन गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने उप विभागीय पोलीस अधिकारी शहापुर मिलींद शिंदे, उप विभागीय पोलीस अधिकारी गणेशपुरी राहुल झाल्टे, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, ठाणे ग्रामीण सुरेश मनोरे, पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकुर शहापुर पोलीस ठाणे यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, शहापुर पोलीस ठाणे, वाशिंद पोलीस ठाणे, पडघा पोलीस ठाणे, कसारा पोलीस ठाणे, भिवंडी तालुका पोलीस ठाणे, किनवली पोलीस ठाणे, सायबर विभाग अशी एकुण १२ पथके तयार करण्यात आली होती.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा व इतर पथकांनी सी.सी.टी. व्ही. च्या माध्यमातून तसेच गुप्त बातमीदार व तांत्रीक तपासाच्या आधारे खूनाच्या गुन्ह्यातील आरोपी काही दिवस भिवंडी येथे राहीले असल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदरचे आरोपीत हे कौशिंबी उत्तर प्रदेश येथील असल्याचे समजल्याने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उप निरीक्षक महेश कदम व शहापुर पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ उत्तर प्रदेश येथे रवाना झाले.

उत्तर प्रदेश येथे गेलेल्या पथकाने प्रयागराज येथील स्पेशल टास्क फोर्सच्या मदतीने वरील गुन्हयातील संशयीत आरोपीत सशांक उर्फ सोनु बलराम मिश्रा वय-३२ रा. बंधवा राजवर, मंझनपुर जि. कौशिंबी उत्तर प्रदेश यास सापळा रचुन ताब्यात घेतले. त्याच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने वरील गुन्हा त्याचा साथिदार व पाहीजे आरोपीत अंकीत उर्फ सिंदु यादव रा. कोकराज जि. कौशिंबी व फैजन पप्पु सिद्धकी जि. कौशिंबी यांचे मदतीने केला असल्याचे सांगीतले. उत्तर प्रदेशातून आरोपींना अटक करून शहापुर पोलीस ठाणे येथे अणून न्यायालयात हजर केले असता आरोपींना १३/ जानेवारी २५ पर्यंत पोलीस कोठडी सुनवण्यात आली आहे.

अटक आरोपी यांची नावे

१. सशांक उर्फ सोनु बलराम मिश्रा वय-३२ रा. बंधवा राजवर, मंझनपुर जि. कौशिंबी उत्तर प्रदेश

२. तौसिफ आलम कबिरूद्दीन सिद्धकी वय-३५ रा. सिरोही ता. चायल जि. कौशिंबी

सशांक उर्फ सोनु बलराम मिश्रावर खुन, खुनाचा प्रयत्न, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

या संदर्भात पोलिस अधीक्षक धोंडोपंत स्वामी यांनी पत्रकार परिषदेत घेऊन माहीत दिली.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. डी.एस. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक भरत तांगडे यांचे मार्गदर्शनाखाली, उप विभागीय पोलीस अधिकारी शहापुर मिलींद शिंदे, उप विभागीय पोलीस अधिकारी गणेशपुरी राहुल झाल्टे, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, ठाणे ग्रामीण सुरेश मनोरे, पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकुर शहापुर पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक हर्षवर्धन बारवे वांशिंद पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक दादासो एडके भिवंडी तालुका पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक बाळा कुंभार पडघा पोलीस ठाणे यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक श्रिकांत शिंदे, दिपाली लंबाते, श्रीकांत जाधव, शिवकुमार जाधव, दानिश मन्सुरी, पोलीस उप निरीक्षक महेश कदम, अंकुश वारूंगसे, पंकज पाटील, आकाश साळुंखे, उमेश खिरड, शरद सुरळकर, सुरेश बाविस्कर, हिंमत सरगर तसेच सहा. फौजदार सुनिल कदम व पोलीस हवालदार/ प्रकाश साईल, संतोष सुर्वे, सतीश कोळी, गोविंद कोळी, हेमंत विभुते, हनुमान गायकर, शशीकांत पाटील, उमेश ठाकरे, भगवान सोनावणे, सुहास सोनावणे, शशी पाटील, अनिल भोसले, पाडुरंग ढोबळे, संतोष तांबोळी, दर्शन साळवे, काशिनाथ सोनावणे, पोलीस नाईक/जितेंद्र वारके, मंजुर शेख, जयवंत मोरे, रामा शिंदे, विकास सानप, अबेद अली सय्यद, पोशि/ स्वप्निल बोडके, जयेश मुकादम, रमेश नलावडे, मोहन भोईर, सरेश धिंदळे, कमलाकर शिरोसे, दशरथ देसले, योगेश वाघेरे, अर्जुन पारधी, कुणाल बावधणे, योगेश निर्मळ, राहुल दाभाडे, नरेश निमसे, दत्ता भोईर, इम्राण शेख, पडवळ, गिरासे, साळुंखे, तडवी, व सायबर विभागाचे पोहा./ दिपक गायकवाड व रवि मोरे या पथकाने उल्लेखनिय कामगिरी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उप विभागीय पोलीस अधिकारी शहापुर मिलींद शिंदे. हे करीत आहेत.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### विरोधक आक्रमक

देशात एकाचवेळी लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुका घेण्यामुळे खरोखर किती पैशांची बचत होणार आहे? एकत्र निवडणुका घेण्याचा नेमका खर्च किती याचा अभ्यास केला गेला आहे? शिवाय, या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी किती मतदानयंत्रांची गरज भासेल आणि त्याची उपलब्धता आहे का, अशा तीक्ष्ण प्रश्नांची सरबत्ती विरोधकांनी प्रामुख्याने काँग्रेसच्या खासदारांनी बुधवारी 'एक देश एक निवडणूक' विधेयकासंदर्भातील संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीत केली. देशात एकत्रित निवडणुका घेण्यासंदर्भातील दोन विधेयके संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत मांडली गेली होती. या विधेयकांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी संयुक्त संसदीय समिती नेमण्यात आली असून तिची पहिली बैठक बुधवारी झाली. सत्ताधारी भाजप व एनडीएतील घटक पक्षांनी विधेयकाचे समर्थन केले. एकत्रित निवडणुका घेण्याला लोकांचा पाठिंबा असल्याचा दावा भाजपचे व्ही. डी. शर्मा यांनी केला. सातत्याने निवडणुका होत राहिल्या तर विकास कामांवर परिणाम होतो. त्यापेक्षा लोकसभा, विधानसभा तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र घेणेच योग्य आहे, असा मुद्दा शिवसेनेच्या शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी मांडला. या बैठकीमध्ये केंद्रीय विधि मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी सादरीकरण केले. या सादरीकरणामध्ये २००४ पूर्वी देशात झालेल्या निवडणुकांच्या खर्चासंदर्भातील संसदीय समितीच्या अहवालाचा उल्लेख केला गेला. मात्र २००४ पूर्वी मतदानयंत्रांचा वापर केला जात नव्हता. विधि मंत्रालयाच्या सादरीकरणाचा संदर्भात काँग्रेसच्या लोकसभेतील खासदार व समितीच्या सदस्य प्रियंका गांधी-वाड्रा यांनी गंभीर आक्षेप घेतले. विधि मंत्रालयाने दिलेली माहिती २००४ पूर्वीची असून त्यावेळी मतदानयंत्रांचा वापर होत नव्हता. मतदानयंत्रांचा वापर सुरू झाल्यानंतर निवडणूक खर्चही कमी झाला असे म्हणत प्रियंका यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले.

# बौद्ध धम्म ध्वज दिन : एक जागतिक उत्सव

८ जानेवारी हा 'विश्व बौद्ध धम्म ध्वज दिन' म्हणून जगभरात साजरा केला जातो. बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण जगातील बौद्धांचे एकच प्रतिक असावे. १८८५ मध्ये श्रीलंकेतील कोलंबो येथे सर्वात प्रथम बौद्ध धम्म ध्वज फडकविण्यात आला. हा दिन ध्वज श्रद्धा आणि शांततेचे प्रतिक म्हणून जगभरात स्वीकारला गेला. धम्म ध्वजाच्या रचनेबाबत अनेक मतांतरे दिसून येतात. अमेरिकेतील निवृत्त आर्मी कर्नल हेनरी स्टील वॉल्कॉट आणि जे. आर. डिसिल्वा यांनी श्रीलंकेमध्ये १८८० च्या मे महिन्यात धम्म ध्वजाची संकल्पना आणि संरचना मांडली असे मानले जाते. वॉल्कॉट यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन धम्म चळवळ आणि बौद्ध शिक्षण पद्धतीचे मूलभूत कार्य सुरू केले होते. श्रीलंकेमध्ये त्यांनी बौद्ध धम्माचे शिक्षण देणाऱ्या ४०० शाळा आणि महाविद्यालयांची निर्मिती केली, त्यापैकी आनंदा, नालंदा, महिंदा आणि धर्मराजा ह्या शिक्षणसंस्था मूलभूत मानल्या जातात.

त्यानंतर १८८४ मध्ये बौद्धांनी ब्रिटिश शासकांकडून वैशाख/वेसक पौर्णिमा दिन हा बुद्ध जयंतीचा दिवस मे १८८५ पासून सार्वजनिक सुट्टी म्हणून साजरा करण्यास परवाना मिळवला. याचवेळी बौद्धांनी 'कोलंबो समितीची' स्थापना केली. या समितीचे प्रमुख वॉल्कॉट, लिटी आणि संघा हे होते. या समितीने २८ मे १८८५ रोजीच्या वैशाख पौर्णिमे रोजी धम्म ध्वज फडकवून पहिल्यांदा सार्वजनिक सुट्टी जाहीररित्या साजरी केली. दहा सदस्यीय कोलंबो समितीने हा ध्वज १७ एप्रिल १८८५ रोजी धम्मध्वज म्हणून समस्त जनतेसमोर आणला.

१८८६ पासून वॉल्कॉट यांनी ध्वजामध्ये केलेल्या सुधारणेनुसार श्रीलंकेतील सर्व शाळा-महाविद्यालयांमध्ये आणि इतर बौद्ध राष्ट्रांमध्ये राष्ट्रीय ध्वज म्हणून फडकविण्याचे आवाहन केले. नंतरच्या काळात प्रा. जी. पी. मालालाशेखर यांनी परंपरेने संरचित केलेल्या ध्वजाचा प्रस्ताव २५ मे १९५० रोजी कँडी येथे झालेल्या 'वर्ल्ड फेडरेशन ऑफ बुद्धिस्ट' च्या बैठकीत मांडून बौद्धांचा अधिकृत ध्वज म्हणून स्वीकारण्याचे आवाहन केले. १९५२ मध्ये 'वर्ल्ड बुद्धिस्ट काँग्रेसनेही' या ध्वजाला 'आंतरराष्ट्रीय विश्व धम्म ध्वज' म्हणून मान्यता दिली आणि सुधारित ध्वज सुरू करण्यात आला व अनागरिक धर्मपाल आणि कर्नल वॉल्कॉट यांनी तो म्यानमारच्या सम्राटाकडे सुपूर्द केला.

१९५२ मध्ये जागतिक बौद्ध परिषदेने हा ध्वज आंतरराष्ट्रीय बौद्ध ध्वज म्हणून स्वीकारला. पुढे १९८५ मध्ये कोलंबो समितीने कोलंबो, श्रीलंका येथे ध्वजाची मूलत: रचना केली गेली. या



- प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

समितीत पूज्य हिक्कादुवे, सुमंगल थेरा (अध्यक्ष), पूज्य मिगेत्तूवेत्ते, गुणानंद थेरो, डोनाल्ड डॉन, कारोलीस हेवावीथारणा, अंद्रीस बायर धम्मगुणवर्धना, चार्ल्स ए. डिसिल्वा, पीटर डी. अब्रेऊ, विलियम डि. अब्रेऊ, विलियम फर्नांडोसा, एन. एस. फर्नांडोसा आणि कार्लीस पूजिथा गुणवर्धना (सचिव) यांचा समावेश होता. विविध देशातील ध्वजांचे रंग, प्रकार सांप्रदायिक बौद्ध ध्वज जगातील वेगवेगळ्या भागातील विहारांमध्ये फडकतात, तथापि अनेक देशातील बौद्धांची स्वत:च्या काही विशिष्ट शिकवणीमुळे बौद्ध ध्वजातील रंगांमध्ये काही बदल करण्यात आलेला आहे. जपानी जुडो शिंशू ध्वजात केशरी रंगाऐवजी गुलाबी रंग आहे. थायलंडचा बौद्ध ध्वज पूर्णपणे मूळ बौद्ध ध्वज आहे पण त्यात धम्मचक्र समाविष्ट केले आहे. नेपाळमधील तिबेटी बौद्ध ध्वजात नारंगी रंगाऐवजी भुरकट रंग वापरण्यात आला आहे. म्यानमारमध्ये थेरवादी बौद्ध ध्वजात नारंगी रंगाच्या स्थानावर गुलाबी रंगाचा उपयोग केला गेला आहे, हा रंग देशातील समस्त भिक्खूनींच्या वस्त्राचा रंग आहे हे अधोरेखित करण्यासारखे आहे. थायलंडमध्ये थेरवादी बौद्ध लाल धम्म चक्र असणाऱ्या पिवळ्या बौद्ध ध्वजाचा उपयोग करतात. अनेकदा आंतरराष्ट्रीय पंचशील बौद्ध ध्वजासोबत या ध्वजाची परेड केली जाते. गोशीमीकामाकु जपानी ध्वजात नारंगी रंगाऐवजी गडद निळ्या रंगाचा उपयोग झाला आहे. अशोकचक्र असलेला निळा भीम ध्वज भारतीय बौद्ध अनुयायांचा ध्वज आहे, हा ध्वज बहुतांशवेळा पंचशील ध्वजासोबतच फडकवला जातो, हा निळा बौद्ध ध्वज आंबेडकरी चळवळ आणि आंदोलनाचे प्रतीक मानले जाते.

कोरियन बौद्ध पांढऱ्या बौद्ध ध्वजाचा उपयोग करतात, ज्यात लाल रंगाचे स्वस्तिक आहे. याचा अर्थ स्वस्तिक हे बौद्ध परंपरेचे प्रतीक आहे असे म्हटले पाहिजे. सोका गकाई तिरंगा बौद्ध ध्वजाचा उपयोग करतात, ज्यामध्ये निळा पिवळा आणि लाल रंग आहे.

यासाठी १८८० मध्ये श्रीलंकेचे अनागरिक देवमित्त धम्मपाल, महास्थवीर गुणानंद सुमंगल, बौद्ध विद्वान जी. आर. डिसिल्वा इत्यादींनी मिळून निळा, पिवळा, लाल, पांढरा व केशरी अशा पाच रंगाच्या उभ्या व आडव्या पट्ट्यामध्ये 'विश्व बौद्ध धम्म ध्वजाची' निर्मिती केली. कालांतराने त्याला वैश्विक मान्यता प्राप्त झाली. या ध्वजाला पाली भाषेत 'षडरोशनी ध्वज' किंवा 'धम्म ध्वज' असे म्हणतात. तसेच याला 'पंचशील ध्वज' असेही संबोधले जाते. या ध्वजाचे आंतरराष्ट्रीय परिमाण/मोजमाप आडवा ७० सें.मी.आणि उभा ५० सें.मी. असे आहे.

१) निळा (इर्श्रीश) रंग : या रंगाचा भावार्थ समानता आणि व्यापकता असा आहे. अर्थात या निळ्या आकाशाखाली सर्व प्राणी, जीवजंतू, पक्षी, व्यक्ती समान आहेत. तसेच हा रंग सार्वभौम करुणेचे प्रतिक आहे. सर्व प्राणीमात्रांप्रति कल्याणाची भावना ठेवण्याचा उपदेश हा रंग देत राहतो.

२) पिवळा (धशश्रश्रे) रंग : हा रंग तथागत बुद्धांनी दिलेला 'मध्यम मार्ग' सांगतो. मध्यम मार्गाच्या अवलंबासाठी 'अष्टांगिक मार्गावरून' चालण्याचा मार्ग तथागतांनी दिला आहे. या मार्गानेच उत्तम, चरित्रसंपन्न जीवन जगून निर्वाण प्राप्त करता येते. हाच प्रगतीचा सरळ आणि सुस्पष्ट मार्ग आहे याची शिकवण हा रंग देतो.

३) लाल (ठशव) रंग : हा रंग जीवनातील सम्यक गतिशीलता आणि दृढ निश्चयाचे प्रतिक आहे. शक्तिमान, ऊर्जावान आणि कष्टाळू बनणे, प्रत्येक व्यक्तीने धम्माचरण करणे, जनकल्याणासाठी कठोर परिश्रम करणे, धम्माच्या रक्षणासाठी वेळप्रसंगी बलिदानही पत्करण्याची शिकवण हा रंग देतो.

४) पांढरा (थहळींश) रंग : या रंगाचा भावार्थ शांती आणि पवित्रता आहे. माणूस मन आणि कर्माने शुद्ध आणि पवित्र असावा, शीलवान आणि चरित्रसंपन्न व्यक्ती बनण्यासाठी शक्य तो प्रयत्न त्याने केला पाहिजे याची शिकवण हा रंग देतो. हा रंग तथागतांच्या विचारांची पवित्रता आणि शुद्धता याचे द्योतक आहे.

५) केशरी (जीरपसश) रंग : हा रंग त्याग, सेवा यांचे प्रतीक आहे. प्रज्ञा, बुद्धिवाद आणि उच्च विद्यांची प्राप्ती करणे, प्रत्येक व्यक्तीने उच्च शिक्षण घेतले पाहिजे, ज्ञानार्जन केले पाहिजे. शिक्षण घेणे ज्ञान प्राप्त करणे हे बुद्धधम्माचे मूलभूत तत्त्व आहे. मनाला सुसंस्कृत आणि नियंत्रित करण्यासाठी ज्ञानाची, शिक्षणाची आवश्यकता असते. ज्ञान मिळविल्याने व्यक्ती प्रज्ञावंत बनू शकतो आणि तो सेवा आणि त्यागासाठी तत्पर राहतो याची शिकवण केशरी रंग देतो. हा रंग तथागत बुद्धांच्या चिवर/काशाय वस्त्राचा रंग आहे जो शक्ती आणि धाडस दर्शवितो. ध्वजातील आडव्या पट्ट्यातील पाच रंग हे विश्वातील जैविक ऐक्याचे तर उभे पाच रंग हे विश्व शांततेचे प्रतीक मानले जाते. हा ध्वज बुद्ध धम्मातील परिपूर्णतेचे प्रतिक आहे. एकूणच हा ध्वज वंश, नागरिकत्व, वर्ग, जात, रंग, नानाविध परंपरा यांमधील भेद मानत नाही.

८ जानेवारी हा 'विश्व बुद्ध धम्म ध्वज दिन' समस्त भारतीय बौद्धांचा सण, उत्सव, सोहळा व्हावा, या दिवशी बौद्धांनी निरंतरपणे एकत्र यावे आणि हा ध्वज जनमनात रूढ होऊन पुढील पिढ्यांकडे संक्रमित व्हावा, या उद्देशाने भारतातील हुपरी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर महाराष्ट्र राज्य याठिकाणी ८ जानेवारी २०१७ रोजी अनेक बुद्धिजीवीनी एकत्र येऊन 'पहिली युवा बौद्ध धम्म परिषद' आयोजित केली होती आणि याच दिवशी आग्रहाने सर्वांनी दरवर्षी एकत्र यावे, या दिवसाचे वैश्विक महत्त्व भारतातील खेड्यापाड्यात राहणाऱ्या लोकांना माहीत व्हावे म्हणून सातत्याने हा दिवस प्रकाशझोतात आणण्यासाठी या परिषदेने पुढच्याच वर्षी ८ जानेवारी २०१८ च्या निमित्ताने आयोजित द्वितीय युवा बौध्द धम्म परिषदेत 'विश्व बुद्ध धम्म ध्वज दिन' बौद्धांना मोठ्या प्रमाणात साजरा करता यावा म्हणून या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहिर व्हावी हा ठराव आणि प्रस्ताव मांडला.

या दिवशी हा धम्म ध्वज बौद्धांनी आपले घर, विहार, तक्क्या, समाज मंदिर, स्मारक,भवन, सभागृह, सांस्कृतिक इमारत, बौद्ध शाळा, शिक्षण संस्था, धम्मपरिषद किंवा सभामंच, धम्म उत्सवाचे स्थळ इत्यादी ठिकाणी सर्वात उंच असा फडकवावा. प्रत्येक बौद्ध व्यक्तीने त्याचा सन्मान आणि अभिमान बाळगावा. ८ जानेवारी हा दिवस मोठ्या उत्सवासारखा साजरा करून धम्म ध्वजास वंदन करावे असे आवाहन केले गेले. प्रतिके जपली आणि मनोमन रुजवली तर क्रांतिकारक ठरतात आणि ती नाकारली तर

व्यापक क्रांतीला आपण मुकुन जाऊ हा संदेश जनमानसात जावा. सर्व बौद्ध बांधवांना आज जागतिक बौद्ध धम्म ध्वज दिनाच्या मन:पूर्वक मंगलमय शुभेच्छा !

## लोकशाहीचे प्रतिनिधी चंद्रशेखर भांगे यांचा आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भूषण पुरस्काराने गौरव



पुणे /प्रतिनीधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि पत्रकार हल्ला कृती समितीच्या वतीने आज आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती निमित्त पिंपरीतील ग. दि. माडगूळकर सभागृहात आयोजित केलेल्या सोहळ्यात चंद्रशेखर भांगे यांचा सपत्नीक सन्मान एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशीक सिने अभिनेते किरण माने आणि आमदार अमित गोरखे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

चंद्रशेखर भांगे यांनी पुण्यातील रुबी हॉल येथील किडनी रॅकेट, ससून रुग्णालयातून सुरू असलेली ड्रग्स रॅकेट, शहरातील बनावट सीबीएससीच्या शाळा, या सह दलित उपेक्षितांचे शेकडो प्रश्न बातम्यांच्या माध्यमातून भांगे यांनी दाखवून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संजय भोकरे.. वसंत मुंडे.. गोविंद वाकडे यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# आजच्या डिजिटल युगात यशस्वी व्हायचे असेल तर वाचन संस्कृती जोपासली पाहिजे : उपायुक्त नितीन बांगर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

येरमाळा/प्रतिनिधी : सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील येरमाळा येथे पत्रकार दिनानिमित्त बोलताना म्हणाले सध्याच्या डिजिटल युगात यशस्वी व्हायचे असेल तर वाचन संस्कृती जोपसली पाहिजे असे मतं विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विक्री व वस्तुकर उपायुक्त (जिएसटी)पुणे नितीन बांगर यांनी मांडले. येरमाळा पत्रकार बहुद्देशीय सामाजिक संस्थेने पत्रकार दीना निमित्त घेतलेल्या विविध शालेय स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात ते बोलत होते.पत्रकार दिनाचे औचित्य साधुन गावातील विविध शालेय स्पर्धा बक्षीस वितरण कार्यक्रमाला कळंब तहसीलदार हेमंत ढोकले,पुण्याचे विक्री व वस्तू कर उपायुक्त (जिएसटी)

नितीन बांगर,स्टेट बँक शाखा व्यवस्थापक महेंद्र भोर,सरपंच मंदाकिनी आबासाहेब बारकुल, माजी सरपंच विकास बारकुल प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री. येडेश्वरी देवी,आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे प्रतिमा पूजन, दिपप्रज्वलना ऐवजी झाडाला मान्यवारांच्या हस्ते पाणी घालुन करण्यात आली.

शाळेतील विविध स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांचे क्रमशः प्रथम सॅक,द्वितीय कादंबरी, तृतीय थोर पुरुष चरित्र पुस्तक ट्रॉफी देऊन तर गावातील सेवा निवृत्त शिक्षकांचा फेटा, शाल, ट्रॉफी देऊन मान्यवारांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी उपस्थित राजकीय पदाधिकारी, प्रतिष्ठित यांचा पत्रकार संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते फेटा बांधून,शाल,ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.येरमाळा पत्रकार बहुउद्देशीय सामाजिक संस्था प्रतिवर्षी पत्रकार दिनानिमित्त गावातील शाळेतील विद्यार्थ्यांच्या निबंध लेखन,वक्तृत्व स्पर्धा घेऊन ६ जानेवारी पत्रकार दीना निमित्त बक्षीस वितरण सोहळा,व परिसरातील विविध प्रशासन सेवेत अधिकारी झालेल्या मान्यवरांना निमंत्रित करुन विद्यार्थ्यांना मार्गर्शन व्हावे म्हणुन कार्यक्रम आयोजित करुन पत्रकार दीन साजरा केला जातो याच कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपायुक्त नितीन बांगर यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, सध्याच्या तंत्रज्ञानाची प्रगती पाहता आता मोबाईलचे डिजिटल युग आहे. पूर्वी एखाद्या विषयावर अभ्यास करायचा म्हटले की विविध नियत कालिके,



पुस्तकांची शोधा शोध करावी लागायची, त्यात वेळ वाया जात असे पण सध्याच्या डिजिटल युगात तुम्हाला मोबाईलच्या एका क्लिकवर कांहीही माहिती उपलब्ध होते. तसे मोबाईलचे दुष्परिणाम ही आहेत मात्र आपण त्याचा वापर कशासाठी करतो याचे भान ठेऊन या डिजिटल मिडीयचा उपायोग अभ्यासासाठी केला तर तुम्हाला यश शंभर टक्के मिळते,सध्या डिजिटल मीडियामुळे वाचन संस्कृती कमी होतं चालली आहे.तुम्हाला जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर माध्यमिक शिक्षण काळात वाचन संस्कृती जोपसली पाहिजे असे मतं विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मांडले

तहसीलदार हेमंत ढोकले यांनी बोलताना सांगितले की मी राज्याच्या अनेक भागात सेवा केली पण पत्रकारांची रजिस्टर्ड बहुउद्देशीय संस्था पहिल्यांदाच पहिल्याचे सांगुन पत्रकार दीना निमित्त विद्यार्थ्यांच्या स्पर्धा, बक्षीस वितरण करुन अनेक वर्षांपासून पत्रकार दीन साजरा करणे उपक्रमाचे कौतुक केले. माजी सरपंच विकास बारकुल यांनी येरमाळा पत्रकार संस्था अनेक सामाजिक उपक्रमात कार्यशील असते सर्व पत्रकार पूर्ण वेळ व्यावसायिक असुन त्याचे सामाजिक उपक्रम पाहुन ग्रामपंचायतने पत्रकार संस्थेला जागा दिल्याचे सांगत या जागेवर संस्थेला मिळालेल्या ग्रामविकास मंत्रालयाच्या पन्नासलाख निधीतुन परिसरातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, व्यायामशाळेच्या दोनमजली इमारतीचे कामं प्रगती पथावर असल्याचे सांगून पत्रकार संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संस्थेचे सचिव दत्ता बारकुल यांनी सूत्रसंचालन हनुमंत पडवळ यांनी केले. तर आभार संस्थेचे अध्यक्ष सचिन बारकुल यांनी मानले.

### शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री येथे बालनाट्य प्रयोग सादर

### रविशंकर इठूले यांचे प्रतिपादन

# माणूस हे बालपणापासूनच हौशी कलावंत म्हणून घडतोय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


गोदिंया/प्रतिनिधी : माणूस हा समाजातील समाजशील प्राणी आहे. मानवाला जगताना राजकीय शैक्षणिक साहित्य सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात वापरावे लागते. तेव्हा समाजाचे प्रबोधन करण्यासाठी व कला कौशल्य सादरीकरण करण्यासाठी कलाकृती निर्माण करावी लागते तरच कलाकार बनतो. म्हणून माणूस हे बालपणापासूनच हौशी कलावंत म्हणून घडतोय. हे खरे आहे. असे प्रतिपादन रविशंकर इठूले यांनी केले. ते कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी रंगमंचावर अद्यापक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पाहुणे म्हणून प्रदीप ढवळे, कार्तिक शहारे, तुषार महाजन, प्रगती खोब्रागडे, सौ. इठूले, सौ. खोब्रागडे, आदेश वासनिक आदी मान्यवर उपस्थित होते.

शाळेतील उपक्रमशील अद्यापक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या निर्मिती व संकल्पनेतून विद्यार्थी हे बाल गंधर्वासारखी स्त्री पात्राची भूमिका साकारणारे २ विद्यार्थी चैतन्य जनबंधू व क्रीश जनबंधू, तसेच यश टेंभूर्णे, कुणाल बडोले, धम्मदीप खोब्रागडे, अथर्व सहारे, आयुष जांभूळकर,चेतन चौधरी, सुजित वालदे, सारस गजभिये ममित वालदे, आर्यन सोनवणे, दक्ष मेश्राम सुशांत वालदे, लोकेश मेश्राम आदी कलावंतांनी भूमिका सादर केली.

याप्रसंगी तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना हार अर्पण करुन सर्वांकडून अभिवादन करण्यात आहे. रसिक प्रेक्षकांना कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन करताना मुन्नाभाई नंदागवळी म्हणाले- व्यक्तीने व्यक्तिरेखा तयार करण्यासाठी अनेक प्रसंगातून जावून घडतो. कलेच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवतांना सामाजिक स्तरावर अनेक भूमिका साकारल्या पाहिजे. त्या जीवनाला कलाटणी देतात. सामाजिक व सांस्कृतिक जीवन हेच ऐके दिवशी आदर्शवत प्रबळ करतात.

या नाट्यप्रयोग नाट्यप्रयोगाचे संचालन चेतन चौधरी यांनी केले तर आभार लोकेश मेश्राम याने केले. यशस्वीतेसाठी आदित्य जमदाळ संचित शहारे धृप लटये, यश वालदे, तुषार साऊस्कार, हेमंत लाडे, यांनी सहकार्य केले.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### किरकोळ कारणावरून तरुणास मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : किरकोळ कारणावरून तरुणास गवत कापण्याच्या विळ्याने कमरेवर मारून लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ६ जानेवारी रोजी रात्री दहा ते साडेदहा वाजण्याच्या सुमारास देशमुख पाटील वस्ती येथे घडली. याप्रकरणी सुरज किरण बनसोडे (वय-२६,रा.देशमुख पाटील वस्ती) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अनिल विष्णू माने, प्रदीप विष्णू माने, प्रशांत विष्णू माने, सुनील विष्णू माने (सर्व रा.देशमुख पाटील वस्ती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादीच्या चुलत्याची दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीसी.१८०५ ही गाडी फिर्यादीच्या ओळखीचा प्रणव तुकाराम बनसोडे यास देऊन गाडी फिर्यादीच्या घरासमोर लाव असे सांगितले असता, प्रणव याने गाडी फिर्यादीच्या घरासमोर न लावता अनिल माने यांच्या घरासमोर लावली.त्यावेळी फिर्यादी घरी येत असताना फिर्यादी यांना गाडी ही वरील संशयित आरोपी यांच्या घरासमोर दिसली व प्रणव तेथे नव्हता तेव्हा फिर्यादीने गाडी कुठे लावायला सांगितली होती असे म्हणून शिवीगाळ केली.त्यानंतर वरील संशयित आरोपी यांनी घराच्या बाहेर येऊन कोणाला शिवीगाळ करतो आम्ही काय बांगड्या घातले आहेत का ? असे म्हणून फिर्यादीशी वाद घालून प्रदीप माने याच्या जवळ असलेल्या गवत कापण्याच्या विळ्याने फिर्यादीच्या कमरेवर मारून जखमी केले तसेच अनिल माने व सुनील माने यांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भालशंकर हे करीत आहेत.

# तब्बल आठ तास आमदार अभिजीत पाटील यांनी घेतला मतदारसंघाचा आढावा

## कुर्डूवाडी पंचायत समिती येथे आमदार अभिजीत पाटील यांनी अधिकाऱ्यांसोबत घेतली बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभा सदस्य पदाची शपथ घेतल्यापासून कामाचा धडाका सुरू केला आहे. पहिल्याच पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनात मतदार संघातील ५५ प्रश्न आमदार म्हणून अभिजीत पाटील यांनी मांडले आहेत.

माढा विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यनिष्ठ आमदार अभिजीत पाटील यांनी मतदार संघाचा संपूर्ण आढावा घेतला. सोमवार दिनांक ६ जानेवारी रोजी माढा पंचायत समिती कुर्डूवाडी या ठिकाणी विविध विभागाची बैठक पार पडली.

तब्बल आठ तास चाललेल्या या बैठकीत प्रामुख्याने रस्ते, वीज तसेच मूलभूत गरजा यावरती चर्चा करून आमदार अभिजीत पाटील यांनी अधिकाऱ्यांचे मतदार संघातील नागरिकांच्या मूलभूत गरजांवरती लक्ष केंद्रित केले.

**यावेळी माढा शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभा करण्याच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा करण्यात आली. तसेच मतदार संघासाठी २२० केवी सब स्टेशन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे बाबत आदेश देण्यात आले.**

यावेळी जिल्हा परिषद सदस्य भारत आबा शिंदे, माढ्याचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी, कृषी अधीक्षक, कृषी अधिकारी, एसटी डेपो मॅनेजर तसेच सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

शासनाच्या विविध योजनेत वंचित घटकांना सामावून घेऊन नागरिकांना योग्य त्या योजनेचा लाभ द्यावा असे आदेश संबंधित विभागाला देण्यात आला. याचबरोबर कृषी विभागातील योजनेचा आढावा घेऊन विविध योजनेसाठी नव्याने फळबागा समाविष्ट करण्या बाबतीत सकारात्मक चर्चा करण्यात आली. याबाबत आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत प्रश्न मांडला होता.

अनेक वर्षांपासून मतदार संघातील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. ही बाब लक्षात घेता मतदारसंघातील ग्रामीण मार्ग बाबतीत आराखडा तयार करून तो लवकरच मंजुरीसाठी देण्यात यावा असे आदेश आमदार अभिजीत पाटील यांच्या वतीने संबंधित विभागांना देण्यात आले. शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी



मतदार संघात अंगणवाडी उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून त्याठिकाणी नवीन अंगणवाडीचे कामाला सुरूवात करण्याचे संबंधितांना आदेश देण्यात आले.

सीना माढा प्रकल्पातून येणारे पाणी हे शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत संबंधिताबरोबर सकारात्मक चर्चा करण्यात आली. निवडणुकीदरम्यान मतदार संघातील नागरिकांना दिलेला शब्द पाळण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करताना आ.अभिजीत पाटील हे दिसत आहेत. तब्बल आठ तास चाललेल्या बैठकीत त्यांनी मतदार संघाचा संपूर्ण आढावा घेतला.




# मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी : डॉ. शिवाजी शिंदे

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : मराठी भाषेला केंद्र शासनाकडून नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही मराठी भाषिकांसाठी अभिमानाची बाब आहे. मराठी भाषा अधिकृतरित्या अभिजात भाषा झाली आहे. आता ती ज्ञानभाषा व्हायला हवी अशी अपेक्षा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव तथा साहित्यिक डॉ. शिवाजी शिंदे यांनी व्यक्त केली.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित, मातोश्री गुरूबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत ' लेखक संवाद ' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिवाजी शिंदे बोलत होते. अध्यक्षस्थानी मलकप्पा भरमशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे मराठी वांग्मय मंडळ विभाग प्रमुख प्रा भीम सोनकांबळे होते.

पुढे बोलताना डॉ. शिंदे म्हणाले, शासनामार्फत तरुणांना वाचनाची सवय लागावी यासाठी ' वाचन संकल्प महाराष्ट्राचा ' या उपक्रमांसारखे उपक्रम राबविले जात आहे. असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवतात म्हणून विदयार्थ्यांपर्यंत असे उपक्रम पोहचविण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने प्रयत्न केले पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले.

### लेखक डॉ. शिवाजी शिंदे यांचा यथोचित सन्मान

**महाराष्ट्र शासनामार्फत १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत लेखक संवाद या कार्यक्रमाचे आयोजन कल्याणशेट्टी महाविद्यालयात करण्यात आले होते या वेळी साहित्यिक डॉ शिवाजी शिंदे यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.**

मराठी भाषा बोलणाऱ्या प्रत्येकाने आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगायला हवा. मराठी भाषेच्या वापरासाठी व वृद्धीसाठी वैयक्तिक व सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

### लेखक संवाद कार्यक्रम

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांनी केली तर आभार प्रा भीम सोनकांबळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ बाळासाहेब पाटील प्रा राजशेखर पवार यांनी प्रयत्न केले

# विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी आनंद मेळाव्याची गरज आहे : नारायणशेठ वाजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांनी खरी कमाई करून मिळालेला आनंद वेगळाच असतो.स्काऊट- गाईडमुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात शिस्त, स्वालंबन,व्यापारीवृत्ती,सहकार्य या गुणांचा विकास होतो. मेळाव्यातून सुजाण नागरिक तयार होतात.

### डुबेरे येथील जनता विद्यालयात आनंद मेळावा उत्साहात

शालेय जीवनात मिळालेल्या ज्ञानाचा विद्यार्थ्यांनी भावी जीवनात उपयोग करावा. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी आनंद मेळाव्याची गरज आहे असे प्रतिपादन शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे यांनी केले. डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्काऊट



- गाईड सेवा महोत्सव अंतर्गत खरी कमाई आनंद मेळावा उद्घाटन समारंभ प्रसंगी श्री. वाजे बोलत होते. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद मेळावा विद्यालयात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी भाऊ रखमा वारुंगसे होते. व्यासपीठावर उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने, श्रीमंत पेशवे पतसंस्थेचे व्हा. चेअरमन अरुण वारुंगसे, माजी सरपंच शरद माळी,अण्णासाहेब वारुंगसे,माजी सरपंच शरद माळी, पोलीस पाटील रामदास वारुंगसे, मुख्याध्यापक रामदास वाजे आदी उपस्थित होते. स्काऊटचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्काऊट - गाईडच्या ध्वजाचे ध्वजारोहण भाऊ वारुंगसे यांच्या हस्ते झाले . विविध स्टॉलचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी प्रास्ताविक करून मेळाव्याचा हेतू स्पष्ट केला. इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या स्टॉलची उभारणी केली होती.विद्यार्थ्यांनी पाववडा ,चटकदार भेळ,चटकदार झणझणीत मिसळपाव, पाणीपुरी,ओली -सुकी भेळ, बिस्किटे,कुरकुरे,चॉकलेट आदींसह विविध प्रकारचे स्टॉल उभारण्यात आले होते. मान्यवरांसह विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थाची चव घेत कौतुक केले. विविध मनोरंजनाचे खेळाचे आयोजन करण्यात आले होते.मेळाव्याला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. विद्यार्थ्यांचा उत्साह प्रचंड ओसंडत होता. सूत्रसंचालन सांस्कृतिक समिती प्रमुख पी.आर.करपे यांनी तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले. मेळावा यशस्वी करण्यासाठी स्काऊट- गाईड समितीचे प्रमुख मारुती डगळे ,सोमनाथ गिरी ,डी.ए. रबडे,सुनिल ससाणे, रेवणनाथ कांगणे, डी.एच.जाधव ,सोमनाथ पगार,जयश्री गोहाड, सीमा गोसावी, व्ही. टी. देवरे, अलका काळोगे,विद्या ठाकरे ,सुनीता ढोली, कचेश्वर शिंदे, राजेंद्र गांगुर्डे किशोर शिंदे ,ज्ञानेश्वर कडभाने आदींसह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# जि.प. कन्नड मुलींची शाळा दुधनीचे वनभोजन कार्यक्रम उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : रोजी जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुली शाळेचे सहशालेय वनभोजन कार्यक्रम दुधनी गावचे सुपुत्र कन्नड मुली शाळेचे सर्वांचे लाडके विज्ञान शिक्षक श्री संतोष शिवपुत्र जोगदे यांचे शेतात संपन्न झाली.

मुख्य अतिथी म्हणून अक्कलकोट तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री प्रशांत आरबाळे साहेब, दुधनी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री सुरेश शटगार साहेब, केंद्रप्रमुख श्री भिमराव धडके साहेब, केंद्रप्रमुख श्री कृष्णांत मोरे साहेब,बीआरसीचे विषय तज्ञ गोविंद राठोड सर , पंडित गुरव, शरद कुंभार आदी उपस्थित होते. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर अन्न हे पूर्णब्रह्म आहे हा गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

मुली विविध पारंपरिक नृत्य ,गायन, विनोद, कथाकथन ,नाटक असे विविध कला सादर केले. मुलीने




आपल्यासोबत घरातून विविध पकवान तयार करून आणले होते. सर्वांनी मिळून एकमेकांचे टिफिन शेअर करून वनभोजन केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुहासिनी गद्दी मॅडम यांचे हस्ते सर्व मुलींना जिलेबी वाटप करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांना श्री संतोष जोगदे सर यांचे स्वखर्चाने धपाट्या ,ज्वारीचे रोटी ,भाकरी शेंगाची पोळी, मसाला ताक ,भज्या पापड असे विविध व्यंजनाचे सर्वांनी मिळून आस्वाद घेतले. श्री संतोष व सौ रूपा जोगदे यांचे विवाह वाढदिवस निमीत्ताने सपत्नीक सत्कार करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री शिवचलप्पा बाबा, श्री महादेव बासरगाव, परमेश्वर वाघोली ,गणपती राठोड ,संतोष जोगदे व सिद्धाराम चौधरी, मंदाकिनी सोनकांबळे मॅडम यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविका श्री संतोष शिवपुत्र जोगदे सर यांनी मांडले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सिद्धाराम चौधरी सरांनी केले. श्री गणपती पवार सरांनी आभार मानले. एकंदरीत हसत खेळत वातावरणात निसर्गाचे सानिध्यात उत्तम रीतीने वनभोजन संपन्न झाला.

**अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निधी कमी पडू देणार नाही** | **विकासकामांचा आढावा**

# अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी योजनांची प्रभावी अंमलबाजवणी करा : अल्पसंख्याक विकास मंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : राज्यातील अल्पसंख्याक समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास करण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. या योजनांची प्रभावी अमंलबजावणी करावी, नाविन्यपूर्ण योजनांच्या माध्यमातून लोकाभिमुख उपक्रम राबवावेत अशा सूचना अल्पसंख्याक विकास मंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबधीत अधिकाऱ्यांना दिल्या. अल्पसंख्याक समाजाच्या



सर्वांगीण प्रगतीसाठी निधी कमी पडू देणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

आज मंत्रालयात मंत्री श्री. भरणे यांनी अल्पसंख्याक विकास विभागाचा आढावा घेतला. यावेळी सचिव रुचेश जयवंशी, सहसचिव मोईन ताशिलदार, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. भरणे म्हणाले, अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहत आणण्यासाठी प्रयत्न करणार असून त्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी कटिबद्ध आहे. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचा निधी वाढविण्यासाठी पाठपुरावा करणे, स्वयंसहायता बचतगट योजना महत्वपूर्ण आहेत. या विभागाच्या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा, अशी सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना केली.

# जिजाऊ ब्रिगेडच्या पुणे विभागीय अध्यक्षपदी प्रा. मीनाक्षी अमोल जगदाळे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेडची बैठक प्रदेश सहसचिव शिवमती स्नेहा ताई खेडेकर आणि प्रदेशाध्यक्ष शिवमती सीमाताई प्रेम कुमार बोके यांच्या उपस्थित पुणे येथे पार पडली.

या बैठकीमध्ये सर्वांमध्ये शिवमती. प्रा. मीनाक्षी अमोल जगदाळे यांची निवड करण्यात आली व प्रदेशाध्यक्ष सौ सीमाताई बोके यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देऊन सत्कार करण्यात आला.

सुमती मीनाक्षी अमोल जगदाळे यांचे सामाजिक राजकीय, शैक्षणिक कार्य विचारात घेऊन त्यांची निवड करण्यात आली. गेल्या दहा वर्षापासून त्या सामाजिक कार्यात सक्रिय आहेत, त्यांना पाच नॅशनल अवार्ड असून, ८० पेक्षा जास्त बक्षिसे त्यांना मिळालेली आहेत, त्या सोलापूर विद्यापीठाच्या डायरेक्टर आहेत, तसेच राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार त्यांना मिळालेला असून, अकरा विषयात त्यांनी पदव्या मिळवलेल्या आहेत आणि सध्या आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र विषयात त्यांची पीएचडी चालू आहे या सर्व कार्याची दखल घेऊन कोणी विभागीय अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली.



सोलापूर जिल्हा सातारा जिल्ह्याची ते काम पाहतील. जिजाऊ ब्रिगेड संघटना निवडी बांधणी आणि विस्ताराचे काम मी करेन तसेच, विभागीय जिल्हा तालुका, ते शाखाप्रमुख सुद्धा कशा वाढतील आणि तळागाळातील जिजाऊ ब्रिगेड वाढवण्याचे काम करणार असल्याचे सौ जगदाळे म्हणाल्या.

यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या सौ सीमाताई बोके, स्नेहा ताई खेडेकर, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे साहेब, प्रेमकुमार बोके, अमोल शेठ शिवाजीराव जगदाळे, जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत नंदाताई शिंदे, निर्मल ताई शेळवणी, अलकाताई माने, प्रियाताई नागणे, वनिता कोरडकर, हेमलता मुलिक, ताई बोराडे समाधान ताई माने, अश्विनी पाटील, संपूर्ण सावंत, सोनाली शिंदे उज्वला कदम, या महिला उपस्थित होत्या.

त्यांच्या निवडीबद्दल मराठा सेवा संघ सामाजिक संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व सर्व पदाधिकारी यांनी त्यांचे मनःपूर्वक कौतुक व अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

